डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त १२५ निवडक गांवांतील दलित वस्त्यांचा सर्वांगिण विकास करणे.
सिध्दार्थनगर, अंबरनाथ, जि.ठाणे.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: दवसु-२०१८/प्र. क्र. ७६/अजाक
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ३१ मार्च, २०१८.

वाचा :

१. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: सान्यावि-२०१५/ प्र. क्र.१६३/ बांधकामे, दिनांक ०९ ऑक्टोबर,२०१५.
२. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक:दवसु-२०१६/प्र. क्र.१५६/ अजाक, दिनांक १२ ऑगस्ट,२०१६.
३. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक:दवसु-२०१६/प्र. क्र.२२७/ अजाक, दिनांक २६ ऑक्टोबर,२०१६.
४. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र, क्रमांक: सकआ/ मावक/ अजानबौघवि/निअजानबौ/डॉबाआं१२५जयंती/२०१७/का-१२/८४०, दिनांक ३० जानेवारी, २०१८.

प्रस्तावना:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त १२५ निवडक गांवांतील दलित वस्त्यांचा सर्वांगिण विकास करण्याचा निर्णय शासनाने उपरोक्त वाचा २ अन्वये घेतलेला आहे. सदर निर्णयांतर्गत “अंबरनाथ शहरातील सिध्दार्थनगर ” येथील दलित वस्तीचा समावेश उपरोक्त वाचा ३ अन्वये करण्यात आलेला आहे. यास अनुसरून, अंबरनाथ शहरातील सिध्दार्थनगर येथील दलित वस्तीच्या विकासाचा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, ठाणे यांनी तयार केलेला खालील प्रस्ताव आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनास निर्णयासाठी सादर केलेला आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	अंदाजित रक्कम रुपये
१.	अंबरनाथ येथील पंप हाऊस ते के. बी. रोड, एम.एस.ई.बी. ऑफिसजवळच्या भिंतीच्याबाजूने सी. सी. रोड व गटार बांधणे.	२०,५१,२८०
२.	अंबरनाथ नगरपरिषदेच्या हददीतील अंबरनाथ नगरपरिषद ते पटेल लो प्राइस, पटेल लो प्राइस ते मशीद येथे सी. सी. गटार बनविणे.	२४,७२,२४५
३.	अंबरनाथ येथील स्टेशन ब्रिज ते गाडी पार्किंगपर्यंत सी. सी. पायवाट बनविणे.	३७,५०,३६६
४.	अंबरनाथ तालुक्यातील नगरपरिषदेच्या हददीतील जुना भेंडीपाडा येथे पायवाट बनविणे.	२१,४८,०००

५.	अंबरनाथ तालुक्यातील नगरपरिषदेच्या हददीतील सिध्दार्थनगर येथे पायवाट बनविणे.	८,८५,०००
६.	अंबरनाथ तालुक्यातील नगरपरिषदेच्या हददीतील यु. टी. एम. सी. सी. सिध्दार्थनगर ते गांधीनगरपर्यंत (पंचायत समितीच्या पाठीमागे) सी. सी. पायवाट बनविणे.	८,२०,०००
७.	अंबरनाथ तालुक्यातील नगरपरिषदेच्या हददीतील मशीद ते डी. एम. सी. नाल्यापर्यंत नवीन सी. सी. पायवाट बनविणे.	१४,८६,०००
	एकूण	१,३६,१२,८९१

(अक्षरी रुपये एक कोटी छत्तीस लक्ष बारा हजार आठशे एक्याण्णव फक्त)

सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त १२५ निवडक गांवांतील दलित वस्त्यांचा सर्वांगिण विकास करण्याचा निर्णयास अनुसरुन आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अंबरनाथ शहरातील सिध्दार्थनगर येथील दलित वस्तीच्या विकासाचा सादर केलेला उपरोक्त रुपये १,३६,१२,८९१/- च्या प्रस्तावास पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर प्रस्तावातील कामे अनुसूचित जाती व नवबौध्द वस्तीतील असल्याबाबत सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, ठाणे यांनी खात्री करावी.
२. सदर प्रस्तावातील कामाचे बांधकाम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा, तसेच विस्तृत नकाशास शासनाने नियुक्त केलेल्या वास्तुशास्त्रज्ञांकडून मंजूरी घेऊनच सुरु करावे.
३. सदर प्रकरणी शासन निर्णय, दिनांक १२ ऑगस्ट,२०१६ मधील परिच्छेद ६ नुसार सदर कामे सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामार्फत करण्यात यावीत.
४. निधी वितरणाच्या मार्गदर्शक सूचना समाजकल्याण आयुक्तस्तरावरुन देण्यात याव्यात.

२. सदर प्रस्तावावर होणारा खर्च हा मागणी क्रमांक एन-३, मुख्य लेखाशिर्ष २२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, ७८९-अनुसूचित जाती घटक योजना,०२-भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरी करणे (योजना-दत्तमत), लेखाशिर्ष-२२२५ डी ८२३ या लेखाशीर्षाखाली खर्ची घालून तो सन २०१७-१८ या वर्षात करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून भागविण्यात यावा. यासाठी आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३३११०३६३८८२२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवांने.

Ajinkya V Bagade

Digitally signed by Ajinkya V Bagade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c2c536d8c69638eb0722b58787e3271291abd492dd102db87dd9f19890bb74ce, cn=Ajinkya V Bagade
Date: 2018.03.31 12:49:55 +05'30'

(अजिंक्य बगाडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. प्रादेशिक उप आयुक्त, समाजकल्याण, मुंबई विभाग, नवी मुंबई.
३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, ठाणे.
४. श्री. नि.भि. भंडारे, कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ, मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, मुंबई.
५. श्री. ह. तु. साळुंके, कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ, मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, मुंबई.
६. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, ठाणे.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) -१, महाराष्ट्र, मुंबई.
८. महालेखापाल (लेखापरिक्षा) -१, महाराष्ट्र, मुंबई.
९. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प/विघयो), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. निवड नस्ती /अजाक.